# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.

## मा.स्थायी समिती

## कार्यपत्रिका क्रमांक – २५

## (सभावृत्तांत)

दिनांक–०६/०९/२०१७ वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा बुधवार, दिनांक ०६/०९/२०१७ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.सावळे सिमा रविंद्र - सभापती
२) मा.ठंडे लक्ष्मण धोंडू
३) मा.कुंदन अंबादास गायकवाड
४) मा.उत्तम प्रकाश केंदळे
५) मा.मुंढे उषा अंकुश
६) मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई
७) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे
८) मा.कुटे निर्मला संजय
९) मा.कोमल दिपक मेवानी
१०) मा.आशा धायगुडे-शेंडगे
११) मा.गोफणे अनुराधा देविदास
१२) मा.वैशाली जालिंदर काळभोर
१३) मा.मोरेश्वर महादू भोंडवे
१४) मा.राजू मिसाळ
१५) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

याशिवाय मा.श्रावण हर्डिकर-आयुक्त, मा.अच्युत हांगे-अति.आयुक्त, मा.उल्हास जगताप-नगरसचिव,मा.तळदेकर-मुख्यलेखापरिक्षक,मा.चव्हाण-शहर अभियंता,मा.डॉ.अनिल रॉय-आरोग्य वैद्यकीय अधिकारी,मा.लांडे-मुख्यलेखापाल,मा.गावडे-सहआयुक्त,मा.पाटील,मा.दुधेकर,मा.पठाण–सहशहर अभियंता, मा.डोईफोडे,मा.दुरगुडे,मा.आष्टीकर,मा.लोणकर,मा.बोदडे,मा.खोत,मा.खोराटे,मा.बहुरे,मा.दांगट-सहाय्यक आयुक्त,मा.पवार-प्र.कायदा सल्लागार,मा.साळुंके-मुख्य उद्यान अधिक्षक,मा.आवारी-प्रशासन अधिकारी (शिक्षणमंडळ), मा.पोमण-मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.शिंपी-नगररचनाकार, मा.सवणे, मा.इंगळे,मा.चव्हाण,मा.थोरात,मा.लडकत,मा.कुलकर्णी,मा.खाबडे,मा.बरशेट्टी,मा.गलबले,मा.घोडे, मा.कांबळे,मा.औंभासे,मा.गट्टूवार,मा.पुजारी,मा.गायकवाड,मा.भोसले,मा.पाटील,मा.घुबे-कार्यकारी अभियंता,मा.डॉ.गोरे-पशुवैद्यकीय अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

(पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने सार्वजनिक गणेशोत्सव विसर्जन घाटांवरील व्यवस्था,सुरक्षितता व स्वच्छता चोख ठेवण्यात आली. शहरात गणेशोत्सव निर्विघ्नपणे पार पडला. याबद्दल मा.स्थायी समितीच्या वतीने मा.महापालिका आयुक्त, सर्व प्रभाग अधिकारी, मा.सहा.आयुक्त आरोग्य, मा.सुरक्षा अधिकारी, सर्व अधिका-यांचे व कर्मचा-यांचे अभिनंदन करुन,मा.महापालिका आयुक्त यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.)

-----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करून घेणेत आले –**

विषय क्रमांक २०) प्रभाग क्र.१३ मधील व्यायामशाळेबाबत-मा.उत्तम केंदळे,मा.कैलास बारणे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक २१) मनपाचे संत शिरोमणी सावतामाळी उद्यान जाधववाडी देखभाल व संरक्षण कामाबाबत – मा.आशा धायगुडे-शेंडगे, मा.माधुरी कुलकर्णी यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक २२) मनपाचे आ.क्र.५२० मळेकर उद्यान, जाधववाडी गायरान देखभाल व संरक्षण कामाबाबत – मा.लक्ष्मण उंडे, मा.उत्तम केंदळे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक २३) अग्निशामक विभागाकडील फायरमन श्री.वाघ यांना रॅपलिंगसाठी आवश्यक साहित्य उपलब्ध करुन देणेबाबत - मा.अनुराधा गोफणे, मा.वैशाली काळभोर यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक २४) श्री.पी.बी.कातोरे, कनिष्ठ अभियंता (विद्युत) यांचा अपिल अर्ज – मा.वैशाली काळभोर, मा.निर्मला कुटे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक २५) श्री.एस.एस.चव्हाण, उपअभियंता (विद्युत) यांचा अपिल अर्ज – मा.अनुराधा गोफणे, मा.निर्मला कुटे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक २६) श्री.एम.एम.चव्हाण, उपअभियंता (विद्युत) यांचा अपिल अर्ज – मा.राजू मिसाळ, मा.लक्ष्मण उंडे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक २७) श्री.महेश कावळे, कनिष्ठ अभियंता (विद्युत) यांचा अपिल अर्ज – मा.आशा धायगुडे-शेंडगे, मा.कोमल मेवानी यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक २८) श्री.अशोक नागो अडसुळे,कनिष्ठ अभियंता (विद्युत) यांचा अपिल अर्ज – मा.वैशाली काळभोर, मा.लक्ष्मण उंडे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक २९) श्री.पाटील एकनाथ बंडू, उपअभियंता (विद्युत) यांचा अपिल अर्ज - मा.लक्ष्मण उंडे, मा.कैलास बारणे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ३०) श्री.नितीन वासुदेव देखमुख, उपअभियंता (विद्युत) यांचा अपिल अर्ज – मा.अनुराधा गोफणे, मा.कैलास बारणे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ३१) श्री.अकबर सुलतान शेख, कनिष्ठ अभियंता (विद्युत) यांचा अपिल अर्ज – मा.अनुराधा गोफणे, मा.कैलास बारणे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ३२) श्रीमती दमयंती पंडीत पवार- कनिष्ठ अभियंता (विद्युत) यांचा अपिल अर्ज – मा.लक्ष्मण उंडे, मा.कैलास बारणे यांचा प्रस्ताव...

-----------

दिनांक २३/०८/२०१७ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक २३) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

-----------

ठराव क्रमांक –८९२ विषय क्रमांक – १
दिनांक – ०६/०९/२०१७ विभाग – उद्यान
सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.कोमल मेवानी
संदर्भ:- मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.उद्यान/२/कावि/१७५९/२०१७ दि.२२/८/२०१७

मा.अति.आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून -

मनपा उदयान विभागाकडील कोटेशन नोटीस क्र.15/2015-16 करीता उद्यान विभागाचे अ, ब, व फ क्षेत्रिय कार्यालयांतर्गत येणा-या उद्यानांच्या कामकाजासाठी ब्रश कटर खरेदी करणेकामी मे.एकदंत ईक्युपमेंट प्रा.लि. कोटेशन नोटीस र.रू.1,80,000/- (अक्षरी र.रू.एक लाख ऐंशी हजार फक्त) अंदाजपत्रकिय दरापेक्षा (0.84% ने कमी) कोटेशन स्वीकृत करणेत आले असून आदेश उदयान/2/कावि/1756/2017 दि.22/08/2017 अन्वये कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे. तसेच महानगरपालिकेच्या सर्व क्षेत्रिय कार्यालयांकडील कामासाठी प्रत्येकी २ ब्रश कटर खरेदी करणेस व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –८९३ विषय क्रमांक – २
दिनांक – ०६/०९/२०१७ विभाग – मुख्यलेखापरिक्षण
सूचक – मा.लक्ष्मण उंडे अनुमोदक – मा.उत्तम केंदळे
संदर्भ:- मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र. मुलेप/६/कावि/१३९/२०१७ दि.२२/८/२०१७

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.०७/०८/२०१७ ते दि.१३/०८/२०१७ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी क्र.मुलेप/६/कावि/१३९/२०१७ दि.२२.०८.२०१७ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –८९४ विषय क्रमांक – ३
दिनांक – ०६/०९/२०१७ विभाग – क क्षेत्रीय कार्यालय,आरोग्य
सूचक – मा.माधुरी कुलकर्णी अनुमोदक – मा.उषा मुंढे
संदर्भ:- मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे जावक क्र.कप्र/आ१५/कावि/८०७/२०१७ दि.२४/८/२०१७

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने मागविलेल्या निविदा नोटीस क्र.२/२०१७-२०१८ क क्षेत्रीय कार्यालय (आरोग्य विभाग) क प्रभागंतर्गत औष्णिक धुरीकरणासाठी तीन चाकी रिक्षा टेम्पो (डिझेलवर चालणारे) भाडयाने घेणेबाबत श्री.संत गाडगेबाबा महाराज बेरोजगार संस्था या संस्थेची निविदा रकमेच्या -१७% म्हणजेच र.रू.३,७७,६५०/-या कमी दराने आलेली आहे. सदर संस्थेस दर कमी करून देणेबाबत पत्र दिले असता दि.२८/०६/२०१७ रोजीचे पत्रान्वये प्रति दिन प्रति

रिक्षा टेम्पो दर र.रू.-१८% म्हणजेच र.रू.३,७३,१००/- कमी या दराने आलेली निविदा सर्वात कमी दरांची असल्याने स्विकारणेबाबत मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी दि.०५/०८/२०१७ रोजीचे प्रस्तावान्वये मान्यता देणेत आली आहे त्यानुसार श्री.संत गाडगेबाबा महाराज बेरोजगार संस्था या संस्थेबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आलेला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –८९५ विषय क्रमांक – ४

दिनांक – ०६/०९/२०१७ विभाग–मध्यवर्ती साहित्य भांडार, वैद्यकीय

सूचक – मा.निर्मला कुटे अनुमोदक – मा.हर्षल ढोरे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मसाभां/५/कावि/४६३/२०१७ दि.२४/०८/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मा.स्थायी समिती ठराव क्रमांक ७५४०, दिनांक ०५/०८/२०१४ नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पिंपरीनगर येथील डिझेल शवदाहिनी चालविणे व निगा देखभाल करणेकामी मे.अर्जुन आधार स्वयंरोजगार संस्था मर्यादित यांचेकडून ई-निविदा नोटीस नुसार प्राप्त झालेल्या दरा नुसार प्रतिमहा र.रु.५२,२५०/-अधिक डिझेल खर्च देणेकामी करारनामा करुन आदेशाच्या तारखे पासून तीन वर्ष काम देण्यास व येणा-या खर्चास मान्यता दिलेली आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पिंपरीनगर येथील डिझेल शवदाहिनी चालविणे व निगा देखभाल राखणेचे कामकाज नविन ई-निविदेची कार्यवाही पूर्ण होईपर्यंत झालेल्या करारनाम्यास अधिन राहून मे.अर्जुन आधार स्वयंरोजगार सेवा सह. संस्था मर्या., यांचेकडून काम करुन घेणेकामी अंदाजे तीन महिने किंवा नविन ई-निविदेची कार्यवाही पुर्ण होईपर्यत मुदतवाढ देणेकामी प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –८९६ विषय क्रमांक – ५

दिनांक – ०६/०९/२०१७ विभाग – यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय

सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.कोमल मेवानी

संदर्भ:- मा.वैद्यकीय अधिक्षक यांचे जावक क्र.YCMH/भांडार/२/कावि/३४६/२०१७ दि.२३/०८/२०१७

मा.वैद्यकीय अधिक्षक यांनी शिफारस केलेप्रमाणे –

यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाच्या डायलिसिस विभागातील गँब्रो कंपनीचे डायलिसीस मशीन सिरीयल क्र.६९९९ व ७५८९ चे AMC करणेकामी संबंधित कंपनी Baxter India Pvt.Ltd, Chennai यांनी सादर केलेले एकूण र.रु.६३,२५०/- चे दरपत्रक स्विकृत करणेत आले असुन त्याकामी त्यांचे समवेत करारनामा करुन AMC चा आदेश एकूण र.रु.६४,९००/- (GST लागु झाल्यानंतर करात वाढ झाल्यामुळे) निर्गत करणेत आलेला असल्याने डायलिसीस विभागातील गँब्रो कंपनीचे डायलिसीस मशीन सिरीयल क्र.६९९९ व ७५८९ चे AMC संबंधित कंपनी Baxter India Pvt.Ltd, Chennai यांचेकडून करणे व सदर AMC करणेकामी चा खर्च

एकूण र.रु.६४,९००/- चे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –८९७ विषय क्रमांक – ६

दिनांक – ०६/०९/२०१७ विभाग – क क्षेत्रिय कार्यालय,विद्युत

सूचक – मा.अनुराधा गोफणे अनुमोदक – मा.वैशाली काळभोर

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.कक्षे/वि/जा/९५२/२०१७ दि.२२/८/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

क क्षेत्रिय कार्यालय विद्युत विभाग अंतर्गत बकरी ईद निमित्त प्रखर प्रकाश व्यवस्था करणेबाबतचे काम तातडीने थेट पध्दतीने मे.त्रिमुर्ती मंडप स्पिकर्स & इलेक्ट्रीकल्स, निगडी पुणे ४४ यांचेकडून क क्षेत्रिय कार्यालयाकडील निविदा क्र.२/५१-१६/१७ चे पुर्व स्विकृत दराने (०.९% कमी) करून घेणेस व सदर कामाचा खर्च र.रू.३,५०,५००/- (अक्षरी र.रू. तीन लाख पन्नास हजार पाचशे फक्त) करारनामा न करता अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –८९८ विषय क्रमांक – ७

दिनांक – ०६/०९/२०१७ विभाग – मध्यवर्ती भांडार

सूचक – मा.राजू मिसाळ अनुमोदक – मा.कुंदन गायकवाड

संदर्भ:- मा.सहा.आयुक्त यांचे जावक क्र.मभां/०४/कावि/५१७/२०१७ दि.२८/८/२०१७

मा.सहा.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महापालिकेतील ज्येष्ठ नागरिक संघासाठी भेटवस्तू (लोखंडी कपाट) साहित्य माहिती व जनसंपर्क विभागाकडील मागणीनुसार खरेदी करणेकामी ई नि.सु.क्र.03/2017-18 अन्वये प्रसिध्द करुन ऑनलाईन निविदा दर मागविणेत आले होते. प्राप्त लघुत्तम निविदाकार मे स्वराज फर्निचर अँड इलेक्टॉनिक्स मॉल, भोसरी यांचे लोखंडी कपाटासाठी प्राप्त लघुत्तम दर प्रती नग र.रु. 9,600/- प्रमाणे 103 नग लोखंडी कपाटासाठी एकुण र.रु.9,88,800/- (अक्षरी र.रु.नऊ लाख अठयाऐंशी हजार आठशे फक्त) इतका खर्च येणार आहे. प्राप्त लघुत्तम दर स्विकृत करणेस मान्यता दिलेली असुन लघुत्तम निविदाकार यांचेबरोबर विहीत नमुन्यात करारनामा करुन पुरवठा आदेश निर्गत करणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –८९९ विषय क्रमांक – ८

दिनांक – ०६/०९/२०१७ विभाग – क क्षेत्रीय कार्यालय

सूचक – मा.कैलास बारणे अनुमोदक – मा.मोरेश्वर भोंडवे

संदर्भ:- मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे जावक क्र.कक्षे/लेखा/नि.क्र./१५/१५७/२०१७ दि.२८/७/२०१७

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने मागविलेल्या नि.नो.क्रं.१/१८ २०१६-१७ चे क क्षेत्रिय स्थापत्य विभागाकडे निविदा नोटिस क्र.१/१८ फुगेवाडी मधील मनपा तालमीजवळ पावसाळी गटर

करणेकामी मे. सुमीत कन्स्ट्रक्शन्स यांना र.रु.६,००,०००/- (अक्षरी र.रु.सहा लाख फक्त) या रक्कमेची निविदा मंजुर(-) १३.५५% कमी दराने नियमानुसार व निविदेतील अटि शर्ती प्रमाणे भाववाढ कमाल मर्यादा मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहिल या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ९००	विषय क्रमांक – ९
दिनांक – ०६/०९/२०१७	विभाग – क क्षेत्रीय कार्यालय
सूचक – मा.लक्ष्मण उंडे	अनुमोदक – मा.उत्तम केंदळे

संदर्भ:- मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे जावक क्र.कक्षे/लेखा/नि.क्र./१५/१५९/२०१७ दि.२८/७/२०१७

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने मागविलेल्या नि.नो.क्रं.१/५२ २०१६-१७ चे क क्षेत्रिय स्थापत्य विभागाकडे निविदा नोटिस क्र.१/५२ दापोडी गणेशनगर भागात पावसाळी गटर करणेकामी मे.सुमीत कन्स्ट्रक्शन्स यांना र.रु.६,००,०००/-(अक्षरी र.रु.सहा लाख फक्त) या रक्कमेची निविदा मंजुर(-) १५.५५% कमी दराने नियमानुसार व निविदेतील अटि शर्ती प्रमाणे भाववाढ कमाल मर्यादा मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहिल या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ९०१	विषय क्रमांक – १०
दिनांक – ०६/०९/२०१७	विभाग – क क्षेत्रीय कार्यालय
सूचक – मा.माधुरी कुलकर्णी	अनुमोदक – मा.उषा मुंढे

संदर्भ:- मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे जावक क्र.कक्षे/लेखा/नि.क्र./१५/१९७/२०१७ दि.२४/८/२०१७

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने मागविलेल्या नि.नो.क्रं.२/१ २०१७-१८ क क्षेत्रिय विद्युत विभागाकडे निविदा नोटिस क्र.२/१ अन्वये क क्षेत्रिय कार्यालयांतर्गत गणेश विसर्जन घाटावर ध्वनीक्षेपन प्रकाश सीसीटीव्ही यंत्रणा बसविणेकामी मे.त्रिमृती मंडप ईले. स्पीकर्स नि.र.रु.६,९६,५५५/- (अक्षरी र.रु.सहा लाख शहान्नव हजार पाचशे पंचावन्न फक्त) पेक्षा(-) ०.८०% कमी दराने ठेकेदाराबरोबर कारारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –९०२ विषय क्रमांक – ११
दिनांक – ०६/०९/२०१७ विभाग – क क्षेत्रीय कार्यालय
सूचक – मा.निर्मला कुटे अनुमोदक – मा.हर्षल ढोरे
संदर्भ:- मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे जावक क्र.कक्षे/लेखा/नि.क्र./१५/१८९/२०१७ दि.१९/८/२०१७

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने मागविलेल्या नि.नो.क्रं.३/१२ २०१६-१७ चे क क्षेत्रिय स्थापत्य विभागाकडे निविदा नोटिस क्र.३/१२ प्रभाग क्र.५८ सांगवी येथे एफ.आर.पी.वाचनालय मुता-या, बसस्टॉप लोखंडी बेचेंस बसविणेकामी मे.जयराम कन्ट्र. नि.र.रु.५,६०,१५६/-(अक्षरी र.रु.पाच लाख साठ हजार एकशे छपन्न फक्त) पेक्षा (-)२३.५०% कमी दराने नियमानुसार व निविदेतील अटि शर्ती प्रमाणे भाववाढ कमाल मर्यादा मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहिल या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –९०३ विषय क्रमांक – १२
दिनांक – ०६/०९/२०१७ विभाग – क क्षेत्रीय कार्यालय
सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.कोमल मेवानी
संदर्भ:- मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे जावक क्र.कक्षे/लेखा/नि.क्र./१५/१५४/२०१७ दि.२७/७/२०१७

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने मागविलेल्या नि.नो.क्रं.१/११ २०१६-१७ चे क क्षेत्रिय स्थापत्य विभागाकडे निविदा नोटिस क्र.१/११ सन २०१६-१७ साठी प्रभाग क्र.३८ मध्ये सुशोभिकरणाची कामे करणेकामी मे सुमीत कन्ट्र. नि.र.रु.६,२९,४८०/- (अक्षरी र.रु.सहा लाख एकोणतीस हजार चारशे ऐंशी फक्त) पेक्षा (-)११.५५% कमी दराने नियमानुसार व निविदेतील अटि शर्ती प्रमाणे भाववाढ कमाल मर्यादा मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहिल या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –९०४ विषय क्रमांक – १३
दिनांक – ०६/०९/२०१७ विभाग – नगरसचिव
सूचक – मा.अनुराधा गोफणे अनुमोदक – मा.वैशाली काळभोर
संदर्भ:- मा.नगरसचिव यांचे जावक क्र.नस/१/कावि/८५४/२०१७ दि.२९/०८/२०१७

नगरसचिव विभागामध्ये कार्यरत असणा-या कर्मचा-यांनी रजा मंजूरीकामी सादर केलेल्या अर्जानुसार प्रस्तावा सोबतचे प्रपत्र 'अ' मध्ये दर्शविले प्रमाणे रजा मंजूरीस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक –९०५ विषय क्रमांक – १४

दिनांक – ०६/०९/२०१७ विभाग – स्थापत्य अ मुख्यालय

सूचक – मा.राजू मिसाळ अनुमोदक – मा.कुंदन गायकवाड

संदर्भ:- मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/नि/अ-मुख्य/५१५/२०१७ दि.२९/८/२०१७

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.६७/१०/२०१६-१७ प्रभाग क्र.१९ मध्ये ठिकठिकाणी स्वच्छतागृह बांधणे व इतर अनुषंगिक कामे करणेकामी M/s.P.A.SHIROLE ENGINEERS & CONTRACTORS नि.र.रु.११,४८,४५३/-(अक्षरी र.रू.अकरा लाख अठ्ठेचाळीस हजार चारशे त्रेपन्न फक्त) पेक्षा १२.००% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.१०,२०,७४५/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**निर्णय-**सन्मा.सदस्या अनुराधा गोफणे यांच्या प्रभाग क्र.५ मधील गवळीनगरमध्ये उद्यानाबाहेर टॉयलेट बांधायचे जे काम चालू केले आहे, हे काम स्लॅबपर्यंत करुन नंतर थांबवले आहे. स्थायी समितीने त्या भागामध्ये ई-टॉयलेट करण्याचे आदेश दिले होते. परंतू चालू असलेले काम थांबवण्याचे आदेश दिलेले नाहीत. म्हणून हे काम पूर्ण करुन घ्यावे. व ई-टॉयलेट त्यांचे नजिक जागेची पाहणी करुन बांधणेत यावेत.

----------

ठराव क्रमांक –९०६ विषय क्रमांक – १५

दिनांक – ०६/०९/२०१७ विभाग – माहिती तंत्रज्ञान

सूचक – मा.कैलास बारणे अनुमोदक – मा.मोरेश्वर भोंडवे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मा.तं.वि/९/कावि/४०७/२०१७ दि.३१/०८/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध विभागाचे संगणकीकरण करणेत आलेले आहे. त्यासाठी आवश्यक असलेली संगणकीय यंत्रणा प्रत्येक विभागात कार्यान्वीत करणेत आलेली आहे. सन २०१७-१८ करीता संगणक यंत्रणा देखभाल दुरुस्तीकामी निविदा सुचना क्रमांक ०६/२०१७-२०१८ अन्वये र.रु.५४,४१,१६७/- ची निविदा प्रसिध्द करुन निविदा दर मागविण्यात आले आहेत. मे.झुम कॉम्प्युटर्स, पुणे यांचे कडून एक वर्षे मुदतीत २२ अभियंते नियुक्त करुन त्यांचे मार्फत मनपाचे संगणक यंत्रणेचे देखभाल दुरुस्तीकामी एकुण र.रु. ४४,३२,५००/- (अक्षरी र.रू.चौवेचाळीस लाख बत्तीस हजार पाचशे फक्त) चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –९०७ विषय क्रमांक – १६
दिनांक – ०६/०९/२०१७ विभाग – वैद्यकिय मुख्य कार्यालय
सूचक – मा.लक्ष्मण उंडे अनुमोदक – मा.उत्तम केंदळे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वैद्य/०१/कावि/१४२०/२०१७ दि.३१/०८/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

वैद्यकिय विभागाकरीता विविध तज्ञ वैद्यकिय अधिकारी, वैद्यकिय अधिकारी, दंतशल्य चिकित्सक व पॅरामेडिकल कर्मचारी या पदावरील उमेदवारांना पुढील ६ महिन्याचे कालावधीसाठी एकत्रित मानधनावर मुदतवाढ मिळणेबाबत तसेच सहा महिनेचे मुदतवाढीचे कालावधीत भविष्यात वेळोवेळी रिक्त होणारी सर्व पदे दर सोमवारी Walk in Interview पध्दतीने मुलाखती आयोजित करुन भरणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –९०८ विषय क्रमांक – १७
दिनांक – ०६/०९/२०१७ विभाग – क्रीडा
सूचक – मा.माधुरी कुलकर्णी अनुमोदक – मा.उषा मुंढे
संदर्भ:- १) मा.अति.आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७अ/कावि/६९३/२०१७ दि.३०/०६/२०१७

२) मा.क्रिडा, कला साहित्य व सांस्कृतिक समिती ठराव क्रमांक ४४ दिनांक २८/०८/२०१७ नुसार

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीने, पुणे जिल्हा कॅरम असोशिएशन यांच्या मान्यतेने व नव प्रगती मित्रमंडळ,इंदिरानगर,चिंचवड,पुणे–४११ ०३३ यांच्या सहकार्याने दि.२९ ते ३१ जूलै २०१७ या काळात सकाळी ९.०० ते रात्री ८.०० या वेळेत पिंपरी चिंचवड म.न.पा.चे कै.सौ.मनिषा भोईर विरंगुळा केंद्र, प्रेमलोक पार्क, चिंचवड, पुणे – ४११ ०३३ येथे महापौर चषक जिल्हास्तर कॅरम स्पर्धा २०१७-१८ (पुरुष गट, महिला गट व जेष्ठ नागरिक गट) आयोजित करणेस व त्याकामी प्रस्तावात नमुद प्रमाणे येणा-या अंदाजे र.रु.३,८२,९६०/- (अक्षरी र.रु.तीन लाख, ब्याऐंशी हजार, नऊशे साठ फक्त) चे खर्चास अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मा.स्थायी समितीची मान्यता घेणेस, सदर खर्चातील स्थापत्य विषयक खर्च र.रु.५०,०००/- हा संबंधित प्रभाग स्थापत्य विभाग व विद्युत विषयक खर्च र.रु.२०,०००/- हा संबंधित प्रभाग विद्युत विभाग यांचे लेखाशिर्षातून खर्ची टाकणेत येईल व उर्वरित र.रु.३,१२,९६०/- हा खर्च क्रीडा विभागाचे महापौर चषक विविध क्रीडा स्पर्धा या लेखाशिर्षातून खर्ची टाकणेत येईल. तसेच ट्रॉफीज, सन्मान चिन्हे खरेदी, पी.व्ही.सी.फ्लेक्स, बॅनर्स, निमंत्रणपत्रिका व प्रमाणपत्रे छपाई पंच व खेळाडू यांकरिता चहा व अल्पोपहार, इ.निविदा पध्दतीने अथवा कोटेशन नोटीस प्रसिध्द करुन करणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेबाबत मा.अति.आयुक्त यांची शिफारस असली तरी पुणे जिल्हा कॅरम असोशिएशन यांनी स्पर्धेची तारीख व स्पर्धा मान्यता दिल्यानंतर स्पर्धा आयोजित करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**निर्णय-१)** क्रिडा विभागाचे कार्यालय मुख्य प्रशासकीय इमारतीत आणावे. स्थायी समिती सभेतून व्यायामशाळांबाबत, ओपन जिमचे साहित्य पुरविणेबाबत जे ठराव मंजूर झाले आहेत, त्याची

अंमलबजावणी क्रिडा विभागाकडून होत नसल्याचे निदर्शनात येते आहे. या ठरावांवर ताबडतोब अंमलबजावणी करण्यात यावी.

**२)** मा.अति.आयुक्त यांना आदेश आहेत की, स्थायी समितीने मान्यता दिलेले व्यायामशाळेसंदर्भातील जितके विषय आहेत, उद्यान विभागासंदर्भातील जे विषय आहेत, त्या सर्व विषयांच्या करारनाम्याच्या फाईल्स पुढील आठ दिवसांच्या आत, पुढील स्थायी समिती सभेपूर्वी मा.सभापती यांच्याकडे सादर कराव्यात. जसा विषय केला असेल तसाच, त्याच नावाने विषय पाठवावेत. आदेशाची अंमलबजावणी न केल्यास काय शिक्षा करायची हे सभेमध्येच सांगितले जाईल.

**३)** सन्मा.नगरसदस्या उषा मुंढे यांनी सांगितल्याप्रमाणे, जे.आर.डी.टाटा उड्डाणपूलाखाली सुशोभिकरणासाठी जी माती टाकली आहे, पावसामुळे ती माती पसरून तिथे चिखल झाल्यामुळे एक विद्यार्थी गाडीवरून घसरून पडला. त्यामुळे तो हॉस्पीटलमध्ये असून कोमात आहे. मा.मुख्य उद्यान अधिक्षक यांनी त्या मुलाच्या हॉस्पीटलमधील उपचाराचा खर्च संबंधित संस्थेला करण्यास सांगावे. आजच त्या ठिकाणाची साईट व्हिजिट करावी. तिथे रस्त्यावर माती,चिखल पडला असेलतर तो रस्ता धुवून काढून घ्यावा व मा.सभापती यांना व्हॉटसअपवर त्याचा फोटो पाठवून द्यावा.

**४)** उद्यान विभागाकडून एखादे काम झाल्यानंतर तिथे माती पडली असेल, स्थापत्य विभागाकडून एखादे बांधकाम पाडल्यानंतर तिथे राडारोडा पडला असेलतर तो उचलण्याची जबाबदारी ही त्या-त्या संबंधित विभागाचीच असल्याने त्यानुसार त्वरित कार्यवाही करावी.

----------

ठराव क्रमांक –९०९ विषय क्रमांक – १८

दिनांक – ०६/०९/२०१७

सूचक – मा.निर्मला कुटे अनुमोदक – मा.हर्षल ढोरे

संदर्भ:- १) मा.बाळासाहेब ओव्हाळ, मा.अंबरनाथ कांबळे यांचा प्रस्ताव

२) मा.क्रिडा,कला,साहित्य व सांस्कृतिक समिती ठराव क्रमांक ४६ दिनांक २८/०८/२०१७ नुसार

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पुनावळे प्रभाग क्र.२५ मधील व्यायामशाळा गुरुदेव मित्रमंडळाला ११ महिने कराराने दरमहा र.रु.२०००/- सेवाशुल्क मनपाकडून घेऊन सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –९१० विषय क्रमांक – १९

दिनांक – ०६/०९/२०१७

सूचक – मा.लक्ष्मण उंडे अनुमोदक – मा.हर्षल ढोरे

संदर्भ:- १) मा.भिमाबाई फुगे, मा.बाळासाहेब ओव्हाळ यांचा प्रस्ताव

२) मा.क्रिडा,कला,साहित्य व सांस्कृतिक समिती ठराव क्रमांक ४७ दिनांक २८/०८/२०१७ नुसार

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कै.धोंडीबा गणपत फुगे, विरंगुळा केंद्र, प्रभाग क्र.०७ मधील मनपाची दिघी रोड व्यायामशाळा पठारे लांडगे तालिम व्यायाम मंडळ यांना ११ महिने कराराने

दरमहा र.रु.२०००/- सेवाशुल्क मनपाकडून घेऊन सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेची मागणी असलीतरी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कै.धोंडीबा गणपत फुगे, विरंगुळा केंद्र, प्रभाग क्र.०७ मधील मनपाची दिघी रोड व्यायामशाळा पठारे लांडगे तालिम व्यायाम मंडळ यांच्याऐवजी सह्याद्री स्पोर्टस् फाऊंडेशन् कासारवाडी यांना ११ महिने कराराने दरमहा र.रु.२०००/- (अक्षरी र.रु.दोन हजार फक्त) सेवाशुल्क मनपाकडून घेऊन सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

<u>यानंतर सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले ऐनवेळचे विषय घेणेत आले -</u>

ठराव क्रमांक – ९११ विषय क्रमांक – २०

दिनांक – ०६/०९/२०१७

सूचक – मा.उत्तम केंदळे अनुमोदक – मा.कैलास बारणे

संदर्भ:- मा.उत्तम केंदळे,मा.कैलास बारणे यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्रभाग क्र.१३ मधील खालील व्यायामशाळा सेवाशुल्क र.रु.२,०००/- प्रती महिना आकारुन ११ महिने कालावधीसाठी चालविणेसाठी देण्यास मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | व्यायामशाळेचे नाव | संस्था/मंडळे |
|---|---|---|
| १ | कै.बिंदुमाधव ठाकरे पुरुष व्यायामशाळा | क्रांतिवीर मित्र मंडळ, यमुनानगर |
| २ | मधुकर पवळे व्यायामशाळा (राजनगर) | ओम साईराम प्रतिष्ठाण, यमुनानगर |
| ३ | मिनाताई ठाकरे महिला व्यायामशाळा | कुलस्वामिनी महासंघ, यमुनानगर |
| ४ | कै.मधुकर पवळे व्यायामशाळा अण्णाभाऊ साठे संकुल | हनुमान जिम, मोरे वस्ती |

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ९१२ विषय क्रमांक – २१

दिनांक – ०६/०९/२०१७

सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.माधुरी कुलकर्णी

संदर्भ:- मा.आशा धायगुडे-शेंडगे, मा.माधुरी कुलकर्णी यांचा प्रस्ताव...

मनपाचे संत शिरोमणी सावतामाळी उद्यान जाधववाडी उद्यान देखभाल व संरक्षणाचे कामकाजात स्थानिक लोकांचा सहभाग असावा या हेतूने स्थानिक असलेली संस्था मे.प्रसन्न स्वयंरोजगार सेवा सह.संस्था यांना उद्यान विभागाच्या प्रचलित दरानुसार २ वर्षे कालावधीसाठी देणेस व त्यासाठी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –९१३ विषय क्रमांक – २२

दिनांक – ०६/०९/२०१७

सूचक – मा.लक्ष्मण ठंडे अनुमोदक – मा.उत्तम केंदळे

संदर्भ:- मा.लक्ष्मण ठंडे, मा.उत्तम केंदळे यांचा प्रस्ताव...

मनपाचे आ.क्र.५२० मळेकर उद्यान व जाधववाडी गायरान उद्यान देखभाल व संरक्षणाचे कामकाजात स्थानिक लोकांचा सहभाग असावा या हेतुने स्थानिक असलेली संस्था मे.प्रसन्न स्वयंरोजगार सेवा सह.संस्था यांना उद्यान विभागाच्या प्रचलित दरानुसार २ वर्षे कालावधीसाठी देणेस व त्यासाठी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –९१४ विषय क्रमांक – २३

दिनांक – ०६/०९/२०१७

सूचक – मा.अनुराधा गोफणे अनुमोदक – मा.वैशाली काळभोर

संदर्भ:- मा.अनुराधा गोफणे, मा.वैशाली काळभोर यांचा प्रस्ताव...

श्री.वाघ, फायरमन यांना त्यांच्या ट्रॅकींग या चढाई करण्याच्या त्यांच्या कामाची/क्रिडा प्रकाराची दखल घेवून त्यांना त्यांच्या क्रिडा प्रकारात आणखी प्राविण्य उपलब्ध होणेसाठी त्यांचे मागणीनुसार अग्निशामक विभागाकडून आवश्यक साहित्य उपलब्ध करुन देण्यास तसेच या क्रिडा प्रकारात श्री.वाघ यांनी सुरक्षेचे सर्व निकष पाळून क्रिडा प्रकार जोपासतील या अटीवर व त्यांच्या जिवीताची हमी त्यांचेवर राहील या अटीवर त्यांना साधने/साहित्य उपलब्ध करुन देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –९१५ विषय क्रमांक – २४

दिनांक – ०६/०९/२०१७

सूचक – मा.वैशाली काळभोर अनुमोदक – मा.निर्मला कुटे

संदर्भ:- मा.वैशाली काळभोर, मा.निर्मला कुटे यांचा प्रस्ताव...

विषय - श्री.पी.बी.कातोरे, कनिष्ठ अभियंता (विद्युत) यांचा दि.६/९/२०१७ चा अपिल अर्ज.

विषय क्र.२४ कामी मा.आयुक्त यांचा अहवाल अपेक्षित असल्याने तो प्राप्त झालेनंतरचे सभेच्या वेळी विषय क्र.२४ चा विचार करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –९१६ विषय क्रमांक – २५

दिनांक – ०६/०९/२०१७

सूचक – मा.अनुराधा गोफणे अनुमोदक – मा.निर्मला कुटे

संदर्भ:- मा.अनुराधा गोफणे, मा.निर्मला कुटे यांचा प्रस्ताव...

विषय - श्री.एस.एस.चव्हाण, तत्कालिन उपअभियंता (विद्युत) यांचा दि.६/९/२०१७ चा अपिल अर्ज.

विषय क्र.२५ कामी मा.आयुक्त यांचा अहवाल अपेक्षित असल्याने तो प्राप्त झालेनंतरचे सभेच्या वेळी विषय क्र.२५ चा विचार करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –९१७ विषय क्रमांक – २६

दिनांक – ०६/०९/२०१७

सूचक – मा.राजू मिसाळ अनुमोदक – मा.लक्ष्मण उंडे

संदर्भ:- मा.राजू मिसाळ, मा.लक्ष्मण उंडे यांचा प्रस्ताव...

विषय - श्री.एम.एम.चव्हाण, उपअभियंता (विद्युत) यांचा दि.६/९/२०१७ चा अपिल अर्ज.

विषय क्र.२६ कामी मा.आयुक्त यांचा अहवाल अपेक्षित असल्याने तो प्राप्त झालेनंतरचे सभेच्या वेळी विषय क्र.२६ चा विचार करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –९१८ विषय क्रमांक – २७

दिनांक – ०६/०९/२०१७

सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.कोमल मेवानी

संदर्भ:- मा.आशा धायगुडे-शेंडगे, मा.कोमल मेवानी यांचा प्रस्ताव...

विषय - श्री.महेश कावळे, कनिष्ठ अभियंता (विद्युत) यांचा दि.६/९/२०१७ चा अपिल अर्ज.

विषय क्र.२७ कामी मा.आयुक्त यांचा अहवाल अपेक्षित असल्याने तो प्राप्त झालेनंतरचे सभेच्या वेळी विषय क्र.२७ चा विचार करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –९१९ विषय क्रमांक – २८

दिनांक – ०६/०९/२०१७

सूचक – मा.वैशाली काळभोर अनुमोदक – मा.लक्ष्मण उंडे

संदर्भ:- मा.वैशाली काळभोर, मा.लक्ष्मण उंडे यांचा प्रस्ताव...

विषय - श्री.अशोक नागो अडसुळे,कनिष्ठ अभियंता (विद्युत) यांचा दि.६/९/२०१७ चा अपिल अर्ज.

विषय क्र.२८ कामी मा.आयुक्त यांचा अहवाल अपेक्षित असल्याने तो प्राप्त झालेनंतरचे सभेच्या वेळी विषय क्र.२८चा विचार करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –९२० विषय क्रमांक – २९

दिनांक – ०६/०९/२०१७

सूचक – मा.लक्ष्मण उंडे अनुमोदक – मा.कैलास बारणे

संदर्भ:- मा.लक्ष्मण उंडे, मा.कैलास बारणे यांचा प्रस्ताव...

विषय - श्री.पाटील एकनाथ बंडू, उपअभियंता (विद्युत) यांचा दि.६/९/२०१७ चा अपिल अर्ज.

विषय क्र.२९ कामी मा.आयुक्त यांचा अहवाल अपेक्षित असल्याने तो प्राप्त झालेनंतरचे सभेच्या वेळी विषय क्र.२९चा विचार करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –९२१ विषय क्रमांक – ३०

दिनांक – ०६/०९/२०१७

सूचक – मा.अनुराधा गोफणे अनुमोदक – मा.कैलास बारणे

संदर्भ:- मा.अनुराधा गोफणे, मा.कैलास बारणे यांचा प्रस्ताव...

विषय - श्री.नितीन वासुदेव देखमुख, उपअभियंता (विद्युत) यांचा दि.६/९/२०१७ चा अपिल अर्ज.

विषय क्र.३० कामी मा.आयुक्त यांचा अहवाल अपेक्षित असल्याने तो प्राप्त झालेनंतरचे सभेच्या वेळी विषय क्र.३० चा विचार करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –९२२ विषय क्रमांक – ३१

दिनांक – ०६/०९/२०१७

सूचक – मा.अनुराधा गोफणे अनुमोदक – मा.कैलास बारणे

संदर्भ:- मा.अनुराधा गोफणे, मा.कैलास बारणे यांचा प्रस्ताव...

विषय - श्री.अकबर सुलतान शेख, कनिष्ठ अभियंता (विद्युत) यांचा दि.६/९/२०१७ चा अपिल अर्ज.

विषय क्र.३१ कामी मा.आयुक्त यांचा अहवाल अपेक्षित असल्याने तो प्राप्त झालेनंतरचे सभेच्या वेळी विषय क्र.३१ चा विचार करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –९२३ विषय क्रमांक – ३२

दिनांक – ०६/०९/२०१७

सूचक – मा.लक्ष्मण उंडे अनुमोदक – मा.कैलास बारणे

संदर्भ:- मा.लक्ष्मण उंडे, मा.कैलास बारणे यांचा प्रस्ताव...

विषय- श्रीमती दमयंती पंडीत पवार- कनिष्ठ अभियंता (विद्युत) यांचा दि.६/९/२०१७ चा अपिल अर्ज.

विषय क्र.३२कामी मा.आयुक्त यांचा अहवाल अपेक्षित असल्याने तो प्राप्त झालेनंतरचे सभेच्या वेळी विषय क्र.३२ चा विचार करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(सिमा रविंद्र सावळे)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/१०/कावि/६८/२०१७
दिनांक - १५/०९/२०१७



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.